महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय- बँक ऑफ इंडियाची इमारत,३ रा माळा,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - १
दूरध्वनी क्र.०२२-२२६७०२१०,२२६७०१४८,२२६७०२४८, २२६७०३३७
फॅक्स क्र. - ०२२ -२२६७३९१५
माझगांव कार्यालय- विक्रोकर भवन, ९ वा मजला, रूम नं.९
सरदार बलवंतसिंग दोषी मार्ग (नेसबीट रोड),माझगांव,मुंबई ४००२०३
दूरध्वनी क्र.०२२ -२३७४२१९१, फॅक्स क्र. ०२२-२३७८१०६१
ई.मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in
वेबसाईट - www.mpsc.gov.in

महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा-२००७

जाहिरात क्रमांक ३७४(१)एक (१) /२००७/तीन

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांतर्गत खालील पदावर भरती करण्यासाठी **"महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा-२००७" दिनांक ९ व १० फेब्रुवारी,२००८ रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या चार जिल्हा केंद्रावर आयोगातर्फे घेण्यात येईल. खालील पदांसाठी पात्र असलेले उमेदवार एकच अर्ज भरून स्पर्धेत भाग घेवू शकतील.**

२. उपलब्ध पदसंख्या :-

अ.क्र.	पदाचे नाव व एकूण पदसंख्या	अराखीव	अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित	अ.जमाती	उन्नत व प्रगत गटात न मोडणारे: वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	वि.मा.प्र.	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
१	**सार्वजनिक बांधकाम विभाग**									
अ	सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ (एकूण पदे - १२)	१२	--	--	--	--	--	--	--	--
	महिला -	४	--	--	--	--	--	--	--	--
	खेळाडू -	१	--	--	--	--	--	--	--	--
	अपंग -	अल्पदृष्टी - १ पद								
ब	सहायक अभियंता, श्रेणी-१, गट-अ (एकूण पदे - ८८)	८८	--	--	--	--	--	--	--	--
	महिला -	२६	--	--	--	--	--	--	--	--
	खेळाडू -	४	--	--	--	--	--	--	--	--
	अपंग -	अल्पदृष्टी - २ पदे, कर्णबधीर - २ पदे								
क	सहायक अभियंता, (स्थापत्य), श्रेणी-२,गट-ब (एकूण पदे-६६)	१८	३+४*	२+२१*	१	१+१*	२	२	१+२*	६+२*
	महिला -	५	३	७	--	--	--	--	१	२
	खेळाडू -	१	--	१	--	--	--	--	--	--
	अपंग -	अल्पदृष्टी - १ पद, कर्णबधीर - १ पद								
२	**जलसंपदा विभाग**									
अ	सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ (एकूण पदे - २५)	११	३	१+३*	१	१	--	१	--	४
	महिला -	३	१	१	--	--	--	--	--	१
	खेळाडू -	१	--	--	--	--	--	--	--	--
	अपंग -	अस्थिव्यंग - १ पद								
ब	सहायक अभियंता, श्रेणी-१, गट-अ (एकूण पदे -१२५)	६१	१५	८+४*	४	३	१	५	३	२१
	महिला -	१८	५	२	१	१	-	२	१	६
	खेळाडू -	३	१	१						१
	अपंग -	अल्पदृष्टी-१ पद, कर्णबधीर-१ पद, अस्थिव्यंग-२ पदे								
क	सहायक अभियंता, (स्थापत्य), श्रेणी-२,गट-ब, (एकूण पदे -३०६)	१४२	३५	१९+२२*	८	८	६	९	६	५१
	महिला -	४३	१०	१३	२	२	२	३	२	१५
	खेळाडू -	७	२	२	-	-	-	-	-	३
	अपंग -	अल्पदृष्टी -३ पदे, कर्णबधीर - ४ पदे, अस्थिव्यंग -३ पदे								
३	**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**									
अ	सहायक अभियंता, श्रेणी-१, गट-अ	अपंग - अस्थिव्यंग -१ पद								
ब	सहायक अभियंता, (स्थापत्य), श्रेणी-२,गट-ब,	अपंग - अस्थिव्यंग -१ पद, कर्णबधीर - १ पद								

२.१ * अशी खूण दर्शविलेली पदे अनुशेषाची आहेत.

२.२ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.३ अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत. अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

३. वेतनश्रेणी :-

३.१ सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ - ८०००-२७५-१३५०० (प्रारंभिक दोन वेतनवाढी) अधिक भत्ते.

३.२ सहायक अभियंता, श्रेणी-१, गट-अ - ८०००-२७५-१३५०० अधिक भत्ते.

३.३ सहायक अभियंता (स्थापत्य), श्रेणी-२, गट-ब - ६५००-२००-१०५०० अधिक भत्ते.

४. पात्रतेच्या अटी :-

४.१ वयोमर्यादा-

४.१.१ उमेदवाराचे वय दिनांक १ फेब्रुवारी, २००८ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षांपेक्षा (मागास वर्गीयाकरिता ३८ वर्षांपेक्षा) जास्त नसावे.

४.१.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(दोन) अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

(तीन) पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(चार) माजी सैनिक / आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(पाच) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

४.२ शैक्षणिक अर्हता :-

४.२.१ सर्व पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता **दिनांक २३ नोव्हेंबर, २००७** रोजी किंवा तत्पूर्वी प्राप्त केलेली असावी. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक डीसीएस/१०८९/२१४८/ का. सेवा ३, दिनांक २५ एप्रिल, १९९० व शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक जीटीआय/१०९८/१४५७९/(२३०/९८)तां.शि./२, दिनांक १५ मार्च, १९९९ तसेच, इतर प्रचलित शासन निर्णयान्वये समकक्ष अर्हता धारण करीत असलेले उमेदवारही अर्ज करण्यास पात्र ठरतील.

४.२.२ मराठीचे ज्ञान आवश्यक.

४.३ विहित वयोमर्यादा व अर्हता असलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावा.

४.४ अपंग उमेदवारांसाठी पात्रता :-

४.४.१ खालील पदांसमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेच्या निकषांची पूर्तता करणारे उमेदवारच त्या त्या पदावर गुणवत्तेनुसार पात्र असतील.

पदाचे नांव	अपंगत्वाचा प्रकार	शासन निर्णय
सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ, सहायक अभियंता, श्रेणी-१, गट-अ, सहायक अभियंता, (स्थापत्य),श्रेणी-२, गट-ब.	अंशतः दृष्टिदोष [Partially sighted/ Low Vision], अंशतः कर्णबधीर [Partially Deaf], अस्थिव्यंग [One leg/ One Arm]	सा.बा.वि. शा.नि. क्र. अपंग २००५ /प्र.क्र.१०२/सेवा-३, दि. ३ ऑक्टोबर, २००५, व पाटबंधारे विभाग शा. नि. क्र.संकिर्ण १००३ /(८२/२००३)/आ (संनि), दि. १३ मे, २००४, शासनाच्या जलसंपदा विभागाने निर्गमित केलेले निकष महाराष्ट्र जिवन प्राधिकरणातील पदांनाही लागू होतील.

४.४.२ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या कळवून आयोगाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

४.५ अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत संपादन केलेली अर्हता विचारात घेतली जाईल. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अपंगत्व असल्यास त्याबाबतचा दाखला, तसेच असल्यास मागासवर्गीयांचा दावा या संबंधातील प्रमाणपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे. असे न केल्यास अर्ज अपूर्ण समजून तडकाफडकी नाकारण्यास योग्य समजला जाईल.

५ अर्ज व माहितीपुस्तिका :-

५.१ स्पर्धा परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेला अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

५.२ अर्ज व माहितीपुस्तिका मिळण्याचे ठिकाण :- अर्जासह माहितीपुस्तिका खालील ठिकाणी पोस्टाच्या कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

५.२.१ जिल्हा आणि तालुक्याच्या बाबत :-

१	महाराष्ट्र राज्यातील सर्व **जिल्हा प्रधान पोस्ट कार्यालये** आणि
२	महाराष्ट्र राज्यातील सर्व **तालुका मुख्य पोस्ट कार्यालये**

५.२.२ मुंबई व नवी मुंबईच्याबाबतीत :-

	मुंबई		
१	**काळबादेवी प्रधान डाकघर,** रेशम बाजार लेन, मुंबई- २	२	**दादर प्रधान डाकघर,** डॉ.बाबा साहेब आंबेडकर मार्ग, मुंबई-१४
३	**चिंचबंदर प्रधान डाकघर,** शायदा मार्ग, मस्जीद रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ९	४	**अंधेरी प्रधान डाकघर,** डी.एन. नगर, अंधेरी, मुंबई- ५३
५	**चेंबूर प्रधान डाकघर,** टेन्थ रोड, मुंबई- ७१	६	**बोरिवली प्रधान डाकघर,** एम.एच.बी.कॉलनी, मुंबई- ९१
७	**माहिम प्रधान डाकघर,** टी. एच.कटारिया मार्ग,मुंबई १६	८	**मुंबई सेंट्रल प्रधान डाकघर,** डॉ. बेलासिस रोड, मुंबई- ८
९	**माझगाव डिलिव्हरी पोस्ट ऑफिस,** तळमजला, पोरबंदर वाला अपार्टमेंट, माझगांव, मुंबई- १०	१०	**स्टॉक एक्स्चेंज पोस्ट ऑफिस,** फोर्ट मेन्शन, हमाम स्ट्रीट,फोर्ट, मुंबई-१
		११	**मुंबई जी.पी.ओ.,** मुंबई- १
	नवी मुंबई		
१	**वाशी पोस्ट ऑफीस,** प्लॉट नंबर १८ व १९, सेक्टर-१६ अ, वाशी-४००७०३		
२	**कोकण भवन पोस्ट ऑफीस,** विभागीय आयुक्त कार्यालय, सिडको भवन समोर, सीबीडी बेलापूर- ४००६१४		

५.३ अर्जासह माहितीपुस्तिका उपलब्ध असलेल्या पोस्ट कार्यालयांची यादी आयोगाच्या वेबसाईटवर **(www.mpsc.gov.in)** उपलब्ध आहे.

५.४ अर्जासह माहितीपुस्तिकेची किंमत **रुपये १००/-** इतकी आहे.

५.५ प्रस्तुत परीक्षेस अर्ज करण्यासाठी "स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज व माहितीपुस्तिका" असे नमूद केलेली (फिक्कट निळया रंगाची) माहितीपुस्तिकाच विकत घ्यावी असे उमेदवारांना सूचित करण्यात येत आहे.

५.६ अर्ज एकदाच व फक्त एकाच परीक्षेसाठी वापरता येईल.

५.७ अर्जासह माहितीपुस्तिकेच्या विक्रीची व्यवस्था फक्त निवडक पोस्ट कार्यालयांतच करण्यात आली आहे. आयोगाच्या कार्यालयात अर्जाच्या विक्रीची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच, अर्ज मागविण्याकरिता पत्राद्वारे विनंती केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

५.८ अर्जासह माहितीपुस्तिकेच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारांनी संबंधित पोस्ट मास्टर अथवा आयोगाच्या कार्यालयांशी वर नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

६. शुल्क :-

६.१ अमागास व माजी सैनिक - रुपये ४००/-

६.२ मागासवर्गीय - रूपये २००/-

६.३ परीक्षा शुल्क आवेदनपत्रासोबत रोखीने भरणे आवश्यक आहे.

७. अर्ज सादर करण्याचे ठिकाण व अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक :-

७.१ संपूर्ण भरलेला अर्ज (अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे) **परीक्षा शुल्कासह** माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या राज्यातील सर्व जिल्हा, प्रधान डाकघर व तालुका मुख्यालयाच्या पोस्ट कार्यालयांपैकी कोणत्याही ठिकाणी कार्यालयीन वेळेत **दिनांक २३ नोव्हेंबर, २००७** पर्यंत स्वीकारण्यात येईल.

७.२ संपूर्ण भरलेला अर्ज व परीक्षा शुल्क विहित पोस्ट कार्यालयातच आणि विहित कालावधीतच स्वीकारण्यात येतील. आयोगाकडे थेट अर्ज पाठवू नयेत. अशाप्रकारे परस्पर पाठविलेले अर्ज आयोगाकडून नाकारले जातील व त्या संदर्भातील चौकशीची दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. आवश्यक अर्हता, पदांबाबतची इतर माहिती, परीक्षा योजना, आरक्षण, निवडीचे सर्वसाधारण स्वरुप, प्रमाणपत्रांचे नमूने, परीक्षा केंद्र इत्यादी माहितीकरिता अर्जासोबत पुरविण्यात येणा-या माहितीपुस्तिकेचे कृपया अवलोकन करावे.

९. सदर जाहिरात व अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

प्र.ई.धवाले
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई :
दिनांक : २४ ऑक्टोबर, २००७